# म हा पा रे ष ण

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**({सां . का . ओळख क्र}CIN No. U40109MH2005SGC153646)**

**वित्त व लेखा, सांघिक लेखा विभाग**

प्रकाशगंगा प्लॉट क्र . सी-१९ 'ई' ब्लॉक

बांद्रा-कुर्ला संकूल बांद्रा (पूर्व) मुंबई - ४00 0५१

वेब साईट : http://www.mahatransco.in

दूरध्वनी क्र . 0२२-२६५९५000/८५९५ फॅक्स क्र . 0२२-२६५९0७६८


**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण MSETCL) या कंपनीने मा . महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (MERC)) यांचेकडे खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केला आहे :—**

**कार्यकारी सारांश** :—

- मा . महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या दर नियमनाच्या अटी व शर्थी वर्ष २0१५ यानुसार आर्थिक वर्ष २0१२-१३ साठी एकूण महासूलाची आवश्यकता (ARR) यांचे सत्य परिस्थितीनुसार समायोजन करणे (Truing up) आणि
- मा . महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे बहुवर्षीय वीज दर नियमन वर्ष २0११ यातील नियमन क्र . ११ नुसार आर्थिक वर्ष २0१३–१४, आर्थिक वर्ष २0१४–१५ व आर्थिक वर्ष २0१५–१६ यांच्या नियमनाच्या कालावधीचा मध्यावधी कार्यपालनाचा आढावा घेणे, तसेच
- मा . आयोगाने प्रकरण क्र . ३९ वर्ष २0१३ यात दिलेल्या आदेशांची पूर्तता करणे व त्यासोबत आर्थिक वर्षे २00७–0८, २00८–0९, २00९–१0, २0१0–११ आणि २0११–१२ या मागील कालावधीत नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाचा आघात (परिणाम = Impact) .

महापारेषण कंपनीने यापूर्वी आर्थिक वर्ष २0११–१२ च्या एकूण महसूलाच्या आवश्यकतेचे (ARR) सत्य परिस्थितीनुसार समायोजन करण्यासाठी, आर्थिक वर्ष २0१२–१३ चे वार्षिक कार्यपालनाचा आढावा घेणे आणि आर्थिक वर्षे २0१३-१४ ते २0१५-१६ यांच्या बहुवर्षीय दर निश्चितीसाठी (MYT Determination) विनंती अर्ज सादर केला होता . त्या प्रकारण क्र . ३९, वर्ष २0१३ मध्ये मा . आयोगाने दि . १३ फेब्रुवारी, २0१४ रोजी आदेश दिला होता . मा . आयोगाच्या आदेशातील सूचना व आक्षेपाच्या शब्दप्रयोगातील काही चुका यामुळे व्यथित झालेल्या (Aggrieved) महापारेषण कंपनीने मा . आयोगाकडे शपथपत्र देऊन आढावा

घेण्यासाठी विनंती अर्ज सादर केला [यात तपशिलवार दर आदेशातील विशिष्ट दृष्टिकोनाचा (aspects) आढावा घेण्यासाठी काही विनिर्देशीत कारणांची यादी दिली होती.] मा. आयोग यांनी महापारेषण कंपनीची विनंती वैध ठरविली आणि प्रकरण क्र.७९, वर्ष २०१४ अंतर्गत दि.२४ जून २०१४ रोजी दरांचा आढावा घेण्याचा आदेश दिला. त्यानंतर मा. आयोग यांनी स्वाधिकाराने (Suo Moto) 'आंतर राज्य' पारेषण दर आदेशाची दुरूस्ती करणारा आदेश प्रकरण क्र.१२३, वर्ष २०१४ यामध्ये दि.१४ ऑगस्ट, २०१४ रोजी जारी केला व त्यानुसार महापारेषण कंपनीसाठी आर्थिक वर्ष २०१४-१५ व आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी दिलेल्या दरात सुधारणा केली. दरम्यान महापारेषण कंपनीने पारेषण दराची मोजणी करण्यासंबंधीच्या काही समस्यांवर एक आढावा घेण्याचा विनंती अर्ज सादर केला. तसेच महापारेषण कंपनी मा.आयोगाला नम्र विनंती करत आहे की, सदर प्रकरण आता जानेवारी २०१५ मध्ये नोंदण्यात येत असल्याने त्याचे जे आघात/परिणाम (Impact) झाले आहेत; त्यांचा विचार मध्यावधी कार्यपालन आढाव्याच्या विनंतीचा भाग म्हणून करण्यात यावा.

महापारेषण कंपनीने अलीकडेच दाखल केलेल्या विनंती अर्जामध्ये मागील वर्षात नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाबाबत समायोजन करण्याचा दावा केला आहे. त्यात नामंजूर केलेला भांडवलीकरणामुळे आर्थिक वर्ष २००७-०८ पासून पुढे झालेल्या आघातांचा (परिणामांचा) हिशेब मांडला आहे. त्यामध्ये घसारा, घसा-याचा अग्रीम (AAD), दिर्घ मुदतीच्या कर्जाचे व्याज, समभागावरील प्राप्ती आणि पारेषण प्रणालीच्या उपलब्धतेबद्दलची प्रोत्साहने यांचा समावेश आहे.

याशिवाय महापारेषण कंपनीने आताच्या विनंती अर्जात आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचे सत्यानुरूप समायोजनाचाही हिशेब केला आहे. या समायोजनाची मोजणी करतांना विनंती अर्जात नमूद केलेली विशेष प्रक्रियेचा अपवाद करून इतर सर्व बाबींसाठी, मा.आयोगाचे यापूर्वीचे आदेश, लेखापरिक्षण केलेले लेख्ये आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग (दराच्या अटी व शर्थी) नियमन-२००५ यात आखून दिलेली तत्वे यांचा आधार घेतला आहे.

तसेच आताच्या विनंती अर्जात महापारेषण कंपनीने वर्ष २०१३-१४ साठी हंगामी सत्यानुरूप समायोजनेचे मापन केले आहे.सदर हंगामी सत्यानुरूप समायोजन करण्यासाठी विनंती अर्जात नमूद केलेली विशेष प्रक्रियांचा अपवाद वगळता, मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांचे बहुवर्षीय दर नियमन-२०११ यात दिलेली तत्वे, हंगामी लेखा आणि मा.आयोगाचे यापूर्वीचे आदेश यांचा आधार घेतला आहे.

अलीकडच्या विनंती अर्जात, महापारेषण कंपनीने मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे (बहुवर्षीय - MYT) नियमन-२०११ यातील तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ यांच्या एकूण महसूलाच्या गरजा (ARR) यांची मोजणी सादर केली आहे.

## १.१ <u>मागील वर्षाच्या नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाचे आघात</u> ः–

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मागील काही वर्षातील म्हणजे आर्थिक वर्ष २००७-०८, आर्थिक वर्ष २००८-०९ आणि आर्थिक वर्ष २०१०-११ यांच्या वार्षिक महसूल गरजांचे सत्यानुरूप समायोजन करताना मत्तांचे भांडवलीकरणाचे दावे (मागण्या) यातील काही रकमा नामंजूर केल्या होत्या.

महापारेषण कंपनीने आताच्या विनंती अर्जात नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाच्या मागण्या/दावे केल्या आहेत. तसेच या विनंती अर्जामध्ये, ज्यांचा दावा केला आहे; असे डी.पी.आर.योजनांचे खर्च-लाभ विश्लेषण (Cost Benefit Analysis) मा. आयोग यांना वेगळे सादर केले आहे. महापारेषण कंपनीने वर नमूद केलेल्या वर्षासाठी नामंजूर केलेल्या भांडवलीकरणाचा नेमका आघात या मत्तांच्या घसा-यावर, तसेच घसा-यापोटीचा अग्रीमावर, दिर्घ मुदतीच्या कर्जाचे व्याज, समभागावरील प्राप्ती आणि पारेषण प्रणालीच्या उपलब्धतेवर किती झाला याचा हिशेब करून तो सादर केला आहे.

**तक्ता क्र.१ ः मत्तांचे भांडवलीकारण नामंजूर केल्याने मागील वर्षात झालेला आघात.**

(रु कोटीत)

| तपशील | आर्थिक वर्ष २००७–०८ | आर्थिक वर्ष २००८–०९ | आर्थिक वर्ष २००९–१० | आर्थिक वर्ष २०१०–११ | आर्थिक वर्ष २०११–१२ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याजातील फरक | १४.१६ | ५४.५३ | १६३.९१ | १५.५० | २३.०७ | २७१.१७ |
| समभागावरील प्राप्तीमधील फरक | १.२६ | ३.०० | ३.५१ | ५.४५ | ७.६३ | २०.८६ |
| पारेषण प्रणाली उपलब्धतेवरील प्रोत्साहनातील फरक | ०.०७ | ०.५१ | २.१४ | ०.३८ | ०.९३ | ४.०३ |
| ए.ए.डी समाविष्ट असलेल्या घसा–यातील फरक | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २२.९९ | २२.९९ |
| **एकूण** | **१५.५०** | **५८.०५** | **१६९.५६** | **२१.३३** | **५४.६१** | **३१९.०४** |

महापारेषण कंपनीने एकूण महसूलाच्या गरजेत झालेली महसूलाची कामतरता (फरक=Gap) आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या एकूण महासूलाच्या आवश्यकतेत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला महापारेषण कंपनीने कळकळीची विनंती केली आहे की, आर्थिक वर्ष २०१२-१३ चे एकूण महसूलाच्या आवश्यकतेचे (ARR) सत्यानरूप समायोजन करतांना त्यांनी ही कमतरता भरून काढावी/(हे अंतर कमी करावे).

## १.२ आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या एकूण महसूल आवश्यकतेचे सत्यानुरूप समायोजन.

महापारेषण कंपनीचे आर्थिक वर्ष २०१२-१३ चे लेखापरिक्षण केलेले वार्षिक लेखे उपलब्ध झाल्यामुळे, कंपनीने आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या एकूण महसूलाच्या आवश्यकतांचे सत्यानुरूप समायोजन करण्याची विनंती केली आहे. लेख्यांच्या सारांशाच्या अवलोकनातून असे स्पष्ट दिसून येते की, या विनंती अर्जात सादर केलेली एकूण महासूलाची आवश्यकताही मा.आयोगाने प्रकरण क्र.३९, वर्ष २०१३ यात तसेच आढावा आदेश क्र.७९, वर्ष २०१४ यात मंजूर केल्यापेक्षा कमीच आहे. कारण कंपनीचे दरबाहय (Non-Tariff) उत्पन्न आणि गोवा, दादरा नगर हवेली यांचे आर्थिक वर्ष २०१२-१३ मधील व्हिलींग चार्जेस तसेच इतर काही वीज निर्मात्यांचे व्हिलींग चार्जेस यांचे काहीसे उत्पन्न मिळाले होते.

या विनंती अर्जात एकत्रित महसूलाची आवश्यकता यामधील इतर लेखाशिर्ष (heads) म्हणजे घसारा व घसा-या पोटीचा अग्रीम (ARR), व्याजाचे खर्च आणि इतर खर्च यांची आकडेवारीसुध्दा मा.आयोगाने मंजूर केलेल्या आकडेवारीच्या तुलनेत कमी आहे.

**तक्ता क्र.२ ः आर्थिक वर्ष २०१२–१३ च्या सत्यानुरूप समायोजनांचा सारांश.**

(रु कोटीत)

| तपशील | बहुवर्षीय दर आदेशः प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ | विनंती | प्राप्ती/हानी यांच्या वाटपानंतर महापारेषणचा निव्वळ हक्क |
|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च | ११७९.९२ | ११२१.०३ | ११९५.१० |
| घसारा | ५३९.५८ | ४४९.९३ | ४४९.९३ |
| घसा–यापोटी अग्रीमे | २७४.२१ | १८९.७९ | १८९.७९ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | ६६८.०९ | ६०६.९७ | ६०६.९७ |
| खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज. | ७९.११ | ८०.३४ | ६४.२४ |
| इतर व्याज व वित्त आकार | १८.५० | ४.६४ | ४.६४ |

| | | | |
|---|---|---|---|
| इतर खर्च | १.१२ | (१०.०२) | (१०.०२) |
| आयकर | १५३.२५ | ३१५.४३ | ३१५.४३ |
| आकस्मिक राखीवतेसाठी अंशदान | ३७.९९ | ३९.५४ | ३९.५४ |
| **एकूण महसुली खर्च** | **२९५१.७८** | **२७९७.६४** | **२८५५.६२** |
| समभाग भांडवलावर प्राप्ती | ६१२.७१ | ६०१.५९ | ६०१.५९ |
| **एकूण महसूलाची गरज** | **३५६४.४९** | **३३९९.२३** | **३४५७.२१** |
| वजा : दरबाहय उत्पन्न | १९२.२१ | १८०.८९ | १८०.८९ |
| वजा : गोवा व दादरा नगर हवेली पासून मिळणारे व्हिलीग चार्जेस उत्पन्न | २६.३० | ९०.२० | ९०.२० |
| **पारेषण दरापासून एकत्रित महसूल गरज** | **३३४५.९८** | **३१२८.१५** | **३१८६.१३** |
| (अधिक) एच.व्ही.ए.सी प्रणालीच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन | — | ४६.४२ | ४६.४२ |
| (अधिक) एच.व्ही.डी.सी. प्रणालीच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन | — | १२.५१ | १२.५१ |
| पारेषण दरापासून महसूल | ३३३८.०८ | ३३३८.०८ | ३३३८.०८ |
| चालू वर्षासाठी महसूलात (अंतर)/अधिक्य | (७.९०) | | ९३.०३ |
| आर्थिक वर्ष २०११—१२ साठी मागील काळाचे खर्च | — | (२३.४१) | (२३.४१) |
| प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ यांत मान्य केलेली मागील वर्षापर्यंत महसूलात (अंतर)/अधिक्य | (११२८.९१) | | (११२८.९१) |
| **वर्षातील संचित महसूली अंतर** | (११३६.८१) | | (१०५९.२९) |

म्हणून मा.आयोग यांना, महापारेषण कंपनी नम्रपणे विनंती करते की, त्यांनी या विनंती अर्जात सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीच्या आवश्यकतेची सत्यानुरूप समायोजनांच्या, दाव्यांना मंजुरी द्यावी तसेच मा. आयोग यांनी सदर महसूलामधील सदर फरक/कमतरता, आर्थिक वर्ष २०१५-१६ वार्षिक महसूलाच्या आवश्यकतेचे समायोजन करतांना त्यात समाविष्ट करावी अशीही विनंती त्यांना करण्यात येते.

## १.३ आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या एकत्रित महसूल आवश्यकतांचे हंगामी समाजोजन.

महापारेषण कंपनी, आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या सत्यानुरूप समायोजनासाठी हा विनंती अर्ज सादर करीत आहे, कारण आर्थिक वर्ष २०१२-१३ चे हंगामी लेखापरिक्षण केलेले लेखे उपलब्ध झाले आहेत. सारांशावरून असे दिसून येईल की, या विनंती अर्जात दाखल केलेली एकूण महसूलाची आवश्यकता ही मा.आयोग यांना प्रकरण ३९, वर्ष २०१३ आणि प्रकरण ७९, वर्ष २०१४ या आढाव्याच्या दिलेले आदेशात मंजूर केलेल्या एकूण महसूलाच्या आवश्यकतेपेक्षा कमी आहे. कारण दरबाहय (Non Tariff) उत्पन्नात थोडी वाढ झाली व आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये गोवा व दादरा-नगर हवेली व इतर वीज निर्मात्यांच्या व्हिलींग चार्जेसचे उत्पन्न मिळाले. या एकूण महसूल आवश्यकता (ARR) मधील दावा केलेले इतर लेखाशिर्ष (Heads) म्हणजे घसारा, व्याज खर्च यातील संख्या ही सुध्दा मा.आयोग यांनी मंजूर केलेल्या आकडेवारीपेक्षा कमीच आहेत. तसेच महापारेषण नम्रपणे निदर्शनास आणू इच्छिते की, आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये संचलन व सुव्यवस्था यांचे खर्च तुलनेत वाढले याचे महत्वाचे कारण म्हणजे वेतन श्रेण्यांमध्ये सुधारणा होणे हेच आहे.

**तक्ता क्र.३ आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या हंगामी समायोजनांचा सारांश.**

(रु कोटीत)

| तपशील | बहुवर्षीय दर आदेश: प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ | विनंती अर्ज | प्राप्ती/हानी यांच्या वाटपानंतर महापारेषणचा निव्वळ हक्क |
|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्था खर्च | १३३४.४९ | ११०७.८५ | १२५४.७६ |
| वेतन सुधारणांचा प्रभाव | — | २९८.७४ | २९८.७४ |
| घसारा | १०७२.६१ | ७२७.३८ | ७२७.३८ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | ८७८.२२ | ७१५.७९ | ७१५.७९ |
| खेळते भांडवल व ग्रहक सुरक्षा अनामतीवरील व्याज. | ११३.०५ | ११४.२८ | ८९.९७ |
| इतर व्याज व वित्त आकार | १६.६० | ३.६० | ३.६० |
| इतर खर्च | १.१४ | २६.२४ | २६.२४ |
| आयकर | १७९.६७ | ५८७.७४ | ५८७.७४ |
| आकस्मिक राखीवतेसाठी अंशदान | ४७.८७ | ४५.७५ | ४५.७५ |
| **एकूण महसूली खर्च** | **३६४३.६५** | **३६२७.३७** | **३७४९.९६** |
| समभाग भांडवलावर प्राप्ती | ७८२.२४* | ७२१.३१ | ७२१.३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| **एकूण महसूली गरज** | **४४२५.९०** | **४३४८.६८** | **४४७१.२७** |
| वजा : दरबाहय उत्पन्न | १९९.०४ | १९८.६९ | १९८.६९ |
| वजा : गोवा व दादरा नगर हवेली पासून मिळणारे व्हिलीग चार्जेस | २६.३० | ९०.१७ | ९०.१७ |
| **पारेषण दरापासून एकत्रित महसूल गरज** | **४२००.५५** | **४०५९.८२** | **४१८२.४१** |
| (अधिक) एच.व्ही.ए.सी प्रणालीच्या पारेषण उपलब्धतेसाठी प्रोत्साहन | | ६०.५९ | ६०.५९ |
| (अधिक) एच.व्ही.डी.सी. प्रणालीच्या पारेषण उपलब्धतेसाठी प्रोत्साहन | | २१.७४ | २१.७४ |
| पारेषण दरापासून महसूल | ५१५२.२२ | ५१५२.२२ | ५१५२.२२ |
| **चालू वर्षासाठी महसूल (अंतर)/अधिक्य** | **९५१.६७** | | **८८७.४८** |

* आर्थिक वर्ष २०१३–१४ साठी रु ७८४.७४ कोटीची सुधारित मंजुरी, प्रकरण क्र.. ७९ वर्ष २०१४ च्या आढावा आदेशानुसार.

यानुसार मा. आयोग यांना महापारेषण कंपनी विनंती करते की, आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या सदर विनंती अर्जात मागणी केलेली निव्वळ समायोजनेत यांना मंजुरी द्यावी. तसेच त्यांनी महसूलात पडलेल्या फरकाला आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या ‘एकत्रित’ महसूलाच्या आवश्यकतेमध्ये समावेश करण्याचीही विनंती मा. आयोग यांना करण्यात येते.

## १.४ आर्थिक वर्ष २०१४-१५ व आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एकत्रित महसूल आवश्यकतेचे सुधारीत अंदाज.

आर्थिक वर्ष २०१२-१३ व आर्थिक वर्ष २०१३-१४ यांची लेखापरिक्षीत केलेल्या माहितीच्या आधारे, महापारेषण कंपनीने आर्थिक वर्ष २०१४-१५ व व २०१५-१६ यांचे सुधारीत अंदाज तयार केले आहेत. सारांशाच्या तक्त्यावरून असे दिसून येईल की, विनंती अर्जात दाखल केलेल्या २०१४-१५ व २०१५-१६ या दोन्ही आर्थिक वर्षामधील पारेषणाच्या दरापासूनच्या एकत्रित महसूलाच्या आवश्यकता या मा. आयोग यांनी प्रकरण क्र. ३९, वर्ष २०१३ याचा आदेश आणि प्रकरण क्र. ७९, वर्ष २०१४ या आढाव्याच्या प्रकरणाचा आदेश, यांत मंजूर केलेल्यांपेक्षा कमी आहेत. त्याचे कारण गोवा, दादरा-नगर हवेली यांचे व्हिलींग चार्जेस व इतर स्तोंत्रांचे उत्पन्न हे आहे. तसेच या विनंती अर्जातील दावा केलेले एकूण महसूलाच्या आवश्यकतेची इतर लेखाशिर्ष

म्हणजे घसारा, व्याजाचे खर्च व समभागावरील प्राप्ती यांची आकडेवारीसुध्दा मा.आयोग यांनी मंजुरी दिलेल्या आकडेवारीपेक्षा कमी आहे.

**तक्ता क्र.४ : आर्थिक वर्ष २०१४-१५ व आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या एकत्रित महसूल आवश्यकतेचे सुधारीत अंदाज.**

(रु कोटीत)

| तपशील | आर्थिक वर्ष २०१४–१५ | | आर्थिक वर्ष २०१५–१६ | |
|---|---|---|---|---|
| | प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ यातील बहुवर्षीय आदेश | विनंती अर्ज | प्रकरण क्र. ३९ वर्ष २०१३ यातील बहुवर्षीय आदेश | विनंती अर्ज |
| संचालन व सुव्यवस्था खर्च | १५४२.१२ | १४९१.०९ | १७७४.९५ | १६७०.२२ |
| वेतन सुधारणांचा प्रभाव | — | १७१.५२ | — | १८१.९८ |
| घसारा | १२५०.९४ | ८१८.०२ | १४११.५३ | ९२२.५७ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज | १०७१.५० | ७९३.३६ | १२२२.३९ | ८६८.४२ |
| खेळते भांडवल व ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज. | ११२.१५ | ११५.८४ | १२७.३९ | १२७.४५ |
| इतर व्याज व वित्त आकार | १८.६४ | १०.९६ | १५.५६ | १२.२३ |
| इतर खर्च | १.१७ | ६.१८ | १.१९ | ६.३१ |
| आयकर | १७९.६७ | ५७४.६० | १७९.६७ | २१२.२६ |
| आकस्मिक राखीवतेसाठी अंशदान | ५५.७२ | ४८.८२ | ६४.६५ | ५३.२७ |
| **एकूण महसुली खर्च** | **४२३१.९०** | **४०३०.३८** | **४७९७.३४** | **४०५४.७१** |
| समभाग भांडवलावरील प्राप्ती | ८८६.३३* | ७७२.५७ | ९८३.७४* | ८३१.९८ |
| **एकूण महसूलाची गरज** | **५११८.२३** | **४८०२.९४** | **५७८१.०८** | **४८८६.६९** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वजा : दरबाहय उत्पन्न | २०८.५६ | ३३४.८५ | २१८.८३ | ३४२.५९ |
| वजा : गोवा व दादरा नगर हवेली यांचेकडून मिळणारे व्हिलीग चार्जेस | २६.३० | ९०.१७ | २६.३० | ९०.१७ |
| **पारेषण दरापासून एकत्रित महसूल गरज** | **४८८३.३७** | **४३७७.९२** | **५५३५.९५** | **४४५३.९३** |
| पारेषण दरापासून महसूल | ५०४४.१९ | ५०४४.१९ | ५५३५.९५ | ५५३५.९५ |
| **चालू वर्षासाठी महसूलात (अंतर)/अधिक्य** | **१६०.८२** | **६६६.२७** | – | **१०८२.०२** |

* आर्थिक वर्ष २०१४–१५ साठी रु ८८८.८३ कोटीची आणि आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी रु ९८६.२४ कोटीची सुधारित मंजुरी, प्रकरण क्र.७९ वर्ष २०१४ च्या आढावा आदेशानुसार.

## १.५ आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी संचित महसूल (फरक)/आधिक्य.

प्रकरण क्र.१२३, वर्ष २०१४ यासाठी दिलेल्या आंतरराज्य (InSTS) पारेषण दर आदेशाच्या आधारे मिळणा-या महसूलाच्या आधारांचा विचार करून आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी महसूलात पडू शकणारा फरक प्रक्षेपित केला आहे. तसेच अंदाजित एकत्रित महसूलाच्या आवश्यकता आणि महसूलातील फरक यांचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे. याशिवाय महसूलात होऊ शकणारी (कमतरता)/आधिक्य यांचा हिशेब मागील प्रत्येक वर्षनिहाय विचार करून केला आहे. त्याचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे.

**तक्ता क्र.५ ः आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या पारेषण दराचा प्रभाव.**

**(रु कोटीत)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०१५–१६ |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी निव्वळ एकत्रित महसूलाची गरज | ४४५३.९३ |
| आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी आय.एन.एस.टी.एस. ऑर्डर मध्ये मंजूर केल्याप्रमाणे पारेषण दरापासूनचा महसूल | ५५३५.९५ |
| वर्षासाठी एकल (स्टॅंड अलोन) (अंतर)/अधिक्य | १०८२.०२ |
| आर्थिक वर्ष २०१४–१५ साठी एकल (स्टॅंड अलोन) (अंतर)/अधिक्य | ६६६.२७ |
| आर्थिक वर्ष २०१३–१४ साठी एकल (स्टॅंड अलोन) (अंतर)/अधिक्य | ८८७.४८ |
| मागील काळातील नामंजूरीत भांडवलीकरणाचा प्रभाव | (३१९.०४) |
| आर्थिक वर्ष २०१२–१३ साठी महसूल (अंतर)/अधिक्य | (१०५९.२९) |

| | |
|---|---|
| सुधारीत समभागावर प्राप्ती व उच्चत्तर दर्जाच्या उपलब्धतेबद्दलच्या प्रोत्साहनाचा प्रकरण क्र. ७९ वर्ष २०१४ आदेशातील लेखांवर परिणाम | (१५.४८) |
| **एकूण** | **१२४१.९६** |

महसूलातील हे आधिक्य आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या एकत्रित महसूलाच्या आवश्यकतेमध्ये समाविष्ट करण्याचा महापारेषणाचा प्रस्ताव असून मा.आयोगाला महापारेषण कंपनी विनंती करते की, आर्थिक वर्ष २०१५-१६ पर्यंतच्या संचित महसूल (फरक)/आधिक्य यामध्ये त्याचा समावेश करावा.

## १.६ पारेषण दराचा प्रभाव (Impact).

मा.आयोग यांनी प्रकरण क्र.१२३, वर्ष २०१४ यामध्ये आंतरराज्य पारेषण दराच्या आदेशात (InSTS) महापारेषण कंपनीला पारेषणाच्या दरातून मासिक वसुली करण्यास मंजुरी दिली आहे. त्यानुसार आणि या विनंती अर्जात सादर केलेले महसूलामधील (कमतरता)/आधिक्य या आधारे राज्यातील वीज वितरणाच्या परवाना धारकांकडून घ्यावयाच्या पारेषणाची दरमहा एकत्रित वसुली रू.१०३.५० कोटींनी कमी होणार आहे. या प्रस्तावित महसूल आधिक्याच्या राज्यातील वीज वितरणाच्या परवानाधारक संस्थांच्या पारेषण दरात होणारा परिणाम खालील तक्त्यात दर्शविला आहे.

## तक्ता क्र.६ ः आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या पारेषण दरावर होणारा प्रभाव.

(रु कोटीत )

| तपशील | अंशदान (%) टक्केवारी | महापारेषणच्या ए आर आर मध्ये वीज वितरण कंपन्यांचे अंशदान प्रकरण क्र. १२३ वर्ष २०१४ च्या आदेशात मंजूर केलेले | महापारेषणच्या ए आर आर मध्ये वीज वितरण कंपन्यांचे अंशदान, विद्यमान विनंती अर्जाच्या आधारे | फरक |
|---|---|---|---|---|
| महावितरण (MSEDCL) | ८२.१७ % | ४५४८.८९ | ३५२८.३७ | १०२०.५२ |
| टाटा पॉवर (वि) | ६.३७ % | ३५२.६४ | २७३.५३ | ७९.११ |
| आर.इन्फ्रा. (वि) | ६.६० % | ३६५.३७ | २८३.४० | ८१.९७ |
| बी.इ.एस.टी. | ४.८६ % | २६९.०५ | २०८.६९ | ६०.३६ |
| एकूण | १००.०० % | ५५३५.९५ | ४२९३.९९ | १२४१.९६ |
| महापारेषण कडून पारेषण दराची मासिक वसूली | | **४६१.३३** | **३५७.८३** | **१०३.५०** |